26/9/14

Sybmm(m)
Creative writing

N010ADE

वेळ : २.३० तास गुण : ७५

सूचना - १. सर्व प्रश्न आवश्यक.
२. उजवीकडील संख्या गुण दर्शवितात.

प्रश्न १ ला : सर्जनशील लेखन म्हणजे काय? विविध उदाहरणे देऊन स्पष्ट करा. (१५)

प्रश्न २ रा : अ. पुढे दिलेले कथासूत्र वापरून कथेच्या घटकांच्या आधारे स्वरचित कथा लिहा. (१५)

**'शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ'**

**किंवा**

ब. पुढे दिलेली कथा वाचून कथेच्या विविध घटकांच्या आधारे स्वरचित कथा लिहा. (१५)

एका जंगलात सांबरांचा कळप होता. लांब व सुंदर शिंगे असलेले एक सांबर त्यांच्यात होते. ते स्वतःवरच खूष होते. स्वतःला इतरांपेक्षा श्रेष्ठ समजत असे. एकदा सांबर एकटेच पाणी प्यायला तळ्यावर गेले. पाणी पिता पिता पाण्यात त्याला आपले प्रतिबिंब दिसले. स्वतःचे रूप पाहून ते सांबर फार खूष झाले. त्याची शिंगे उंच होती. ती वर्तुळाकार होत गेली होती. निमुळती होऊन ती टोकदार झाली होती. त्या शिंगांमुळे ते अधिकच सुंदर दिसत होते. त्याचवेळी सांबराचे लक्ष आपल्या पायांकडे गेले. ते बारीक काटकुळे पाय पाहून ते दुःखी झाले.

इतक्यात त्याला शिकाऱ्याची चाहूल लागली. सांबर पळू लागले. शिकारी पाठलाग करीत होता. सांबर वेगाने पळत होते. त्याला पळायला त्याचे ते काटकुळे बारीक पायच मदत करीत होते. त्याच्या मनात आले, "अरे, आताच काही वेळापूर्वी मी या पायांना नावे ठेवली. पण आता प्राण वाचवायला या पायांनीच मला मदत केली".

शिकारी सांबराच्या मागे होताच. धावता धावता सांबर एका झुडपात शिरले. पण त्याची ती सुंदर शिंगे एका झुडपात अडकली. शिकारी जवळ आला, त्याने सांबरावर गोळी झाडली. खाली कोसळता कोसळता ते म्हणाले, "अरे, रे! ज्या शिंगांना मी आताच नावाजले, त्यांनीच माझा घात केला".

NOIOADE

**प्रश्न ३ रा :** अ. (१) पुढील कविता वाचून त्यातील सूत्र, भाषाशैलीचे, अलंकार, प्रतिकात्मकता इत्यादी काव्य घटकांच्या आधारे तिचे विश्लेषण करा. **(१०)**

येत हा पाऊस
येत पाऊस
मातीचा सुटत
सुप्त सुवास

झंझावत वाहे
उठे वादळ
आभाळास मिळे
पृथ्वीची धूळ

मेघांनी भरून
आकाश वाके
भूमीस आपल्या
छायेत झाके

अवचित लवे
वीज लाजरी
होतसे मीलन
अश्रूंच्या सरी

गरजे बरसे
आसुसलेला
पहिला पाऊस
उल्हासलेला

NOIOADE

आला हा पाऊस

१आला पाऊस

मातीचा भरला

उन्मत्त वास !

**अ.** **(२)** पुढे दिलेल्या कोणत्याही एका विषयावर स्वरचित कविता लिहा **(५)**

**'माऊली' किंवा 'पाणी'**

**किंवा**

**ब.** खाली दिलेल्या विषयांपैकी कोणत्याही **तीन** विषयांवर जाहिराती तयार करा. **(१५)**

**१)** नवीन बँक **२)** भांड्याचा साबण. **३)** साड्यांचे नवीन दुकान.

**४)** नवीन हौसिंग सोसायटी. **५)** नवीन वृत्तपत्र.

**प्रश्न ४ था : अ.** पटकथा लेखन म्हणजे काय ते सांगून टीव्हीसाठी 'वृक्ष संवर्धन' या विषयावर पटकथा तयार करा (१० मिनिटांसाठी). **(१५)**

**किंवा**

**ब.** संहिता लेखन म्हणजे काय ते सांगून रेडिओसाठी 'मुलगी वाचवा' या विषयावर संहिता लिहा. (१० मिनिटांसाठी). **(१५)**

**प्रश्न ५ वा : टीपा लिहा (कोणत्याही तीन)** **(१५)**

१. इंटरनेटवरील बातम्यांचे वैशिष्ट्य.

२. नाटकातील संवादाचे महत्त्व.

३. बौद्धिक स्वात्मिक हक्क.

४. ब्लॉग्ज.

५. कथा आणि कवितेच्या भाषेतील वेगळेपण. .